क्र.मनपा/नसवि/२/विस/ ०२ /२०१३-२०१४
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ०१ जून २०१३

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## महानगरपालिका विशेष सभा क्रमांक - ०२ /२०१३-२०१४

## महानगरपालिका विशेष सभेची नोटीस

प्रति,
मा. ______________________
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ड) (ह) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची विशेष सभा **गुरुवार दि.०६/०६/२०१३ रोजी दुपारी ०३.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली येथे आयोजित केली आहे.** सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

परिशिष्ठ

१. महानगरपालिकेच्या दि.०१/०४/२००६ ते दि.३१/०३/२०१० या कालावधीतील विशेष लेखापरिक्षणाचा अनुपालन अहवाल मा.विभागीय आयुक्तसो यांचेकडे सादर करणेस मान्यता देणेबाबत उपायुक्त (लेखा परिक्षण विभाग) **यांचे दि.२९/०५/२०१३ चे विषयपत्र.**

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

टिप -: (१) विशेष लेखापरिक्षण अनुपालन अहवाल पाहणेसाठी नगरसचिव विभाग,प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.१,२,३,४ यांचे कार्यालयात सुट्टीखेरीज कार्यालयीन वेळेत पाहणेसाठी उपलब्ध होतील.

(२) विशेष लेखापरिक्षण अनुपालन अहवाल महापालिकेच्या www.smkc.gov.in. या संकेत स्थळावर प्रसिद्ध करणेत आला आहे.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**विशेष महासभा क्रमांक :- ०२** दिनांक :- ०६/०६/२०१३

ठराव क्रमांक :- १५०

विषय क्रमांक :- ०१

महानगरपालिकेच्या लेखापरिक्षण विभाग यांचे दिनांक २९/०५/२०१३ चे विषयपत्र अवलोकनी घेण्यात आले. महानगरपालिकेच्या दिनांक ०१/०४/२००६ ते दिनांक ३१/०३/२०१० या कालावधीतील विशेष लेखापरिक्षणाचा प्रशासनाने तयार केलेला अनुपालन अहवाल मा. विभागीय आयुक्तसो यांचेकडे सादर करणेबाबत सभागृमध्ये सविस्तर चर्चा करणेत आली. चर्चे अंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आले.

महानगरपालिकेच्या दिनांक ०१/०४/२००६ ते दिनांक ३१/०३/२०१० या कालावधील विशेष लेखापरिक्षणाचा प्रशासनाने तयार केलेला अनुपालन अहवाल अवलोकनी घेतला. सन्मा.सदस्य यांचेवर कोणत्याही प्रकारची तोशिष येणार नाही या दृष्टीने सन्मा.सदस्य यांचेकडून खालील तपशिला प्रमाणे अनुपालन अहवालावरील महासभेचा शेरा नोंदवून मा.विभागीय आयुक्त यांचेकडे सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

१) **परिच्छेद क्र. १ ते २५ -** मधील विषय हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६७ (३) (क) च्या वापराबाबत असून, सदरच्या कलमाबाबतचे अधिकार महासभेचे नसल्याने व महासभेने या कलमाचा वापर केलेला नसलेने या कार्यवाहीस महासभा जबाबदार नाही.

२) **परिच्छेद क्र. २६ -** स्थायी समिती ठराव क्र.२३६ दि.२०/०१/२००९ अन्वये केलेल्या कार्यवाहीबाबत मा.महासभा ठराव क्र.१९७ दि.२०/०२/२०१० या ठरावाने केवळ अहवाल सादर करणेबाबत आदेशीत करण्यात आलेले होते. तसेच स्थायी समिती ठराव क्र.२३६ दि.२०/०१/२००९ हा ठराव प्रशासनाने दिलेल्या विषयपत्रानुसारच पारित करण्यात आलेला असल्याने याबाबत कोणतीही जबाबदारी महासभा अथवा स्थायी समिती यांची नाही.

३) **परिच्छेद क्र. २७ -** सदरचा प्रकल्प कार्यान्वीत करीत असताना निविदा प्रक्रियेत पुरेशा प्रमाणात पात्र निविदा प्राप्त झाल्या नाहीत.अशावेळी किमान दोन वेळा मुदतवाढ देणेची कार्यवाही आवश्यक असताना तसे न करता एक वेळ मुदतवाढ देवून संबंधीत निविदा महासभेकडे सादर करण्यात आलेल्या होत्या. प्रशासनाने दिलेल्या प्रस्तावानुसार महासभेने त्यास मान्यता दिली असल्याने याबाबतची जबाबदारी महासभेवर येत नाही.

४) **परिच्छेद क्र. २८ -** महासभेच्या मान्यते शिवाय परस्पर केलेली कार्यवाही असल्याने महासभेची कोणतीही जबाबदारी उद्‌भवत नाही.

५) **परिच्छेद क्र. २९ -** IRDP अंतर्गत प्रकल्प अहवाल सादर केल्याशिवाय प्रकल्प कार्यान्वीत होवू शकत नाही. प्रकल्प अहवाल तयार करण्यापूर्वी सर्वेक्षण करणे व प्रकल्प अहवाल तयार करणे योग्य योग्यता अहवाल तयार करणे ही कामे पूर्ण केल्याशिवाय प्रकल्प अहवाल सादर केला जावू शकत नाही. त्यामुळे प्राथमिक अत्यावश्यक बाब म्हणून सर्वेक्षण किंवा प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी माहिती उपलब्ध करुन घेणे ही कामगिरी प्रथम करावी लागते म्हणून सदरची कामगिरी करुन घेणेत आलेली आहे. नियोजनातील पहिला टप्पा म्हणून ही कामगिरी करुन घेणे आवश्यक होते. त्यानंतरच हा प्रकल्प कार्यान्वीत होत असल्याने हा प्रकल्प पूर्व नियोजीत नव्हता असे म्हणणे योग्य होणार नाही.

... २ ...

६) **परिच्छेद क्र. ३०** - जरी ई-टेंडरींग कार्यचाही प्रत्यक्षात सुरु झाली तरी शासन निर्णयानुसार ३३:३३:३४ या निकषाप्रमाणे कार्यवाही ठेवणेत आली आहे व त्यामध्ये ३४% ई-टेंडरींगमार्फत कामे करणेत आली आहे. शासन निर्णयास अधीन राहून ही कार्यवाही केली असल्याने या संदर्भात कोणतीही जबाबदारी नाही.

७) **परिच्छेद क्र. ३१** - ऐनवेळचे ठराव त्यावेळच्या प्राप्त परिस्थितीनुसार घेणेत आलेले आहे असे असले तरी आर्थिक बाबींचा एकही ठराव केले नसल्याने सदरचा आक्षेप वगळण्यात यावा.

८) **परिच्छेद क्र. ३२ ते ४७** - सदरच्या परिच्छेदातील आक्षेप योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटी या प्रशासनाच्या असून, सदरच्या त्रुटी प्रशासनामार्फत दूर करण्याचे आहेत. त्यामुळे यात महासभेची जबाबदारी नाही.

९) **परिच्छेद क्र. ४८** - महासभा ठरावास शासन मान्यता मिळाल्याने सदर परिच्छेद वगळण्यात यावा.

१०)**परिच्छेद क्र. ४९ ते ६१** - सदरच्या परिच्छेदातील आक्षेप हे प्रशासनाच्या कामकाजातील त्रुटीसंदर्भात असल्याने त्यांची जबाबदारी संबंधीत विभाग प्रमुख यांची आहे. त्यांचेकडून संबंधीत त्रुटींची पुर्तता प्रशासनाने करावयाची असून याची महासभेची जबाबदारी नाही.

सूचक :- [signature]

अनुमोदक :- [signature]

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]

महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.